# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. 9 अंतर्गत मेकोसाबाग शाहु मोहल्ला येथे नाला वॉलचे
**{सा.बां.वि. झोन क्र. १०}** बांधकाम करण्याबाबत रू. 32,03,724/- (रू. बत्तीस लक्ष तीन हजार सातशे चोबीस फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. A43901370812 अंतर्गत विभागाव्दारे तयार केलेले आहे. सदर्हु रू. 32,03,724/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवुन हाती घेण्याचा तसेच पद क्र. A43901370812 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप : —

१. प्रस्तावित काम हे पद क्र. A43901370812 (नागपूर शहरातील नाले बांधणे) अंतर्गत प्रस्तावित असुन सदर्हु कामास सन 2024-25 च्या आर्थिक वर्षात, सदर्हु पदा अंतर्गत राशी रू. 32,03,724/- चे प्रावधान प्राप्त आहे.

२. या कामास्तव मा. अधिक्षक अभियंता यांनी SE/PWD/T.S./252/2024-25 दि. 20/09/2024 अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केलेली आहे.

३. सविस्तर टिप्पणी नस्तीत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 1222/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 23/01/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंगळवारी झोन क्र. १० यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. 9 अंतर्गत मेकोसाबाग शाहु मोहल्ला येथे नाला वॉलचे बांधकाम करण्याबाबत रू. 32,03,724/- (रू. बत्तीस लक्ष तीन हजार सातशे चोबीस फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. A43901370812 अंतर्गत विभागाव्दारे तयार केलेले आहे. सदर्हु रू. 32,03,724/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवुन हाती घेण्याचा तसेच पद क्र. A43901370812 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.